पुढारी पृ. पा. २.

# भाईंदरमध्ये 'पठाण'चे बॅनर फाडले; तोडफोड

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या काही दिवसांपासून पठाण चित्रपटावरून राज्यभरात संताप व्यक्त होत असताना बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी दुपारी तोडफोड केली. भाईंदर पश्चिमेच्या मॅक्सस मॉल चित्रपटगृहातील तिकीट खिडकीबाहेर लावलेले पठाण सिनेमाचे पोस्टर फाडले व लाकडी दांडके व दगड भिरकावून चित्रपटगृहात तोडफोड केली.

भाईंदर पश्चिमेच्या मॅक्सस सिनेमागृहात पठाण चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. या चित्रपटाविरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी सिनेमागृहाबाहेर लावलेल्या पोस्टरची तोडफोड केली आहे. यावेळी बजरंग दलाचे १५ ते २० कार्यकर्ते असल्याचे सांगितले. यापैकी ९ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पठाण हा सिनेमा प्रदर्शित झाल्यापासून या सिनेमाला हिंदुत्ववादी संघटनांकडून विरोध केला जात आहे. त्याचेच पडसाद मिरा-भाईंदर शहरात उमटले आहे. भाईंदर पश्चिमेला असलेल्या मॅक्सस सिनेमा येथे गृहाच्या तिकीट खिडकीच्या बाहेर लागलेले पोस्टर बजरंग दलाच्या १५ ते २० कार्यकर्त्यांनी सिनेमा गृहाबाहेर लागलेले पोस्टर फाडले व दगडफेक करत काचेची तोडफोड करण्यात आली आहे.

यावेळी हे कार्यकर्ते वंदे मातरम व जय श्रीराम अशा घोषणा देत होते. काही वेळात पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत ९ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चित्रपटात बेशरम रंग गाण्यामध्ये दीपिकाने परिधान केलेल्या भगव्या रंगाच्या बिकिनीवर आक्षेप घेत चित्रपटातील काही दृश्ये काढण्याची मागणी केली होती.

सामना पा. नं. ७

## गावगुंडांचा जाच

# वसईत तरुणीची आत्महत्या

वसई, दि. २९ (सा. वा.) – रात्री-अपरात्री व्हॉट्सअॅपवर मेसेज आणि फोन करून त्रास देणाऱ्या गावगुंडांच्या जाचाला कंटाळून वसईतील २१ वर्षीय तरुणीने गळफास घेत जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी वसई पोलीस ठाण्यात दोघा आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

वसई पश्चिमेच्या किरवली खारभाट वाडी येथील तरुणीला दोन तरुणांनी रात्री फोन आणि मेसेज करून त्रास देण्यास सुरुवात केली होती. तसेच तिच्या विरोधात बदनामीकारक आरोप केल्याने तरुणीला मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते. अखेर तिने राहत्या घरी रात्री गळफास लावून आत्महत्या केली. याबाबत तिच्या वडिलांनी वसई पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांनी या प्रकरणाची कैफियत मांडल्यानंतर पोलिसांनी दोन तरुणांविरोधात तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

पुढारी पु.पा.१०

# प्रलंबित मागण्यांसाठी २० फेब्रुवारीपासून अंगणवाडी सेविका संपावर

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

मानधन वाढीसाठी तसेच शासन दरबारी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मागण्याची दखल केंद्र आणि राज्य सरकार घेत नसल्याने राज्यातील अंगणवाडी सेविका येत्या २० फेब्रुवारी पासून बेमुदत संपाचा इशारा महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

राज्य शासनाने अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढवले, त्याला साडेपाच वर्षे तर केंद्र सरकारच्या मानधन वाढीला साडेचार वर्षांचा काळ लोटला. मानधन वाढ झाली नाही तरी तुटपुंज्या मानधनात सेविका रात्रदिवस काम करत आहेत. कोरोना हटवण्यासाठी दिवस रात्र कष्ट घेतले. पण त्याचे फळ काय मिळाले? असा सवाल महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे निमंत्रक एम. ए. पाटील यांनी दैनिक पुढारीशी बोलतांना केला.

महागाई दुपटीने वाढली पण मानधनात वाढ नाही, अंगणवाड्यांच्या भाड्यात, आहाराच्या दरात वाढ नाही, सेवा समाप्ती लाभ मिळत नाहीत, आजारपणाच्या रजा नाहीत, हक्काच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या देखील कमी झाल्या आहेत, हे सेविकांचे वर्षानुवर्षेचे प्रश्न तसेच आहेत. एकीकडे सरकार डिजीटल इंडियाच्या गप्पा मारते, मात्र दुसरीकडे सरकारने सेविकांना दिलेला मोबाईल मोडीत काढण्यासारखाच आहे. नव्या मोबाईलच्या मागणीसाठीही आंदोलने झाली, पण त्याचा काहीच उपयोग नाही, याच मोबाईल वर असलेल्या पोषण ट्रॅकरची भाषा मराठी करावी, यासाठीही आंदोलने झाली, पण मायबोलीत हे ॲप करण्यात आले नाही, अशी खंत पाटील यांनी व्यक्त केली.

## शासनाकडून फक्त आश्वासने आणि तारीख पे तारीख

**इंग्रजी भाषेतील सदोष पोषण ट्रॅकर ॲप सेविकांवर लादला. सेविका आपल्या खासगी मोबाईलवरून, जमत नसेल तर इतरांना वेठीला धरून तो भरायला भाग पाडले, उच्च न्यायालयाचे आदेशरदेखील शासनाने धाब्यावर बसवले. ॲपचा वापर न करणाऱ्या सेविकांवर कारवाया करण्याच्या धमक्या देण्यात आल्या, याकडे त्यांनी लक्ष वेधले. शासनाने फक्त आश्वासने आणि तारीख पे तारीखच दिल्याने अंगणवाडी सेविकांची सहनशक्ती संपली आहे. त्यामुळे आता बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

पुण्यनगरी पु.पा.४

# वर्षभरात वाहन चोरीचे ३८३ गुन्हे उघडकीस

**मीरारोड :** मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये २०२२ या पूर्ण वर्षभरात मोठ्या प्रमाणात दुचाकी व चारचाकी वाहन चोरी झाल्याचे प्रकार उघडकीस आले आहे. २०२२ या वर्षभरात वाहन चोरीचे झाल्याचे ८४४ गुन्हे दाखल झाले असून, त्यापैकी ३८३ गुन्हे उघडकीस आले आहेत, तर २०२१ या वर्षात ८६९ गुन्हे दाखल असून ३१९ गुन्हे उघडकीस आले आहेत.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तलयाच्या हद्दीमधील काशिमीरा, नयानगर, माणिकपूर, वालीव,पेल्हार या पोलीस ठाण्यांमध्ये वाहन चोरींचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण जास्त असून, दाखल गुन्ह्यांची संख्यादेखील जास्त आहे. नवघर, मीरा रोड, उत्तन, भाईंदर, वसई, नालासोपारा, अर्नाळा, मांडवी, आचोळे, तुळिंज या पोलीस



ठाण्यांमध्ये उघडकीस आलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण कमी आहे.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वात जास्त वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. एक कॅमेरा शहरासाठी या पोलिसांच्या संकल्पेतून शहरात जास्तीत जास्त कॅमेरे बसवण्यात आल्याने वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. तरीदेखील गेल्या वर्षभरात ८४४ वाहने चोरी झाल्याचे गुन्हे दाखल असून, त्यातील फक्त ३८३ वाहन चोरींचे गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले आहेत. २०२१ व २०२२ या दोन्ही वर्षांत दाखल असलेले गुन्हे व उघड आणलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी पाहता २०२२ या वर्षात पोलिसांनी वाहन चोरीचे जास्त गुन्हे उघडकीस आणले आहेत. उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असून, लवकरच वाहन चोरीचे सर्व गुन्हे उघडकीस आणले जातील, असे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे.

CamScanner

सकाळ पु.पा.१.

# वसई-विरारमध्ये पाणीबाणी

## महिलांचा पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्याला घेराव

वसई, ता. २९ (बातमीदार) : शहरात जानेवारी महिन्यातच पाणीसमस्या भेडसावू लागली आहे. यामुळे नालासोपारा येथे महिलांनी पाण्यासाठी आक्रोश करत पाणीपुरवठा कर्मचाऱ्याला घेराव घातला.

वसई-विरारसह नालासोपारा पूर्वेला काजूपाडा, आंबा वाडी, तुळिंज या भागात नागरिकांना पाणी मिळत नाही. विरार पूर्वेलाही अशीच परिस्थिती आहे. अशातच नालासोपारा परिसरात पाणीबाणी निर्माण झाल्याने महिलांनी पाणीपुरवठा कर्मचाऱ्याला घेराव घातला. दरम्यान, महापालिका प्रशासनाने ज्या परिसरात पाणी मिळत नाही त्याचा आढावा घेऊन,



वसई : शहरात जानेवारी महिन्यातच पाणीसमस्या भेडसावू लागली आहे.

करदात्यांकरिता पाण्याची व्यवस्था करावी, असे मत स्थायी समितीचे माजी सभापती सुदेश चौधरी यांनी मांडले.

नालासोपारा पूर्वेकडे झालेल्या आंदोलनात बविआचे परिवहन समिती सदस्य अमित वैद्य, 'श्रमजीवी'चे पदाधिकारी कृष्णा बाबू दसवत, भाजपचे विश्वास सावंत, शिवसेनेचे सुनील भोंडवे व परेश कोंडविलकर आदी मंडळी जमा झाली. यानंतर पाणी विभागाच्या कर्मचाऱ्यांना बोलावण्यात आले. या वेळी लवकरच पाणी समस्या दूर केली जाईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

काजूपाडा व अन्य भागात कमी दाबाने पाणी येत असल्याने महिलावर्गाची गैरसोय होत आहे. त्यामुळे परिसराची पाहणी करण्यात आली. तसेच पाणी विभागाच्या कर्मचाऱ्यांना बोलावून समस्या सोडवावी, असे म्हणणे मांडले.
- अमित वैद्य, परिवहन समिती सदस्य

शहरात ज्या ठिकाणी पाणी येत नाही किंवा कमी दाबाने, अनियमित पाणीपुरवठा होत आहे, त्याची माहिती घेऊन महापालिकेचे आयुक्तांची भेट लवकरच घेणार असून नागरिकांना मुबलक पाणी मिळावे, ही मागणी करणार आहे.
- उमेश नाईक, माजी उपमहापौर

सामना पा.नं.८.

# लव्ह जिहादच्या विरोधात हिंदू जन आक्रोश मोर्चा

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - लव्ह जिहाद, धर्मांतर आणि लँड जिहाद विरोधातील कायदा राज्यासह संपूर्ण देशात लागू करण्याच्या मागणीसाठी मुंबईत सकल हिंदू समाजाकडून आज हिंदू जन आक्रोश मार्चा काढण्यात आला होता.

छत्रपती शिवाजी महाराज मैदान ते कामगार मैदान असा हा मोर्चा काढण्यात आला . या मोर्चात शिंदे गट व भाजपचे प्रमुख नेते सहभागी झाले होते. लव्ह जिहाद, धर्मांतरविरोधी कायद्याच्या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने संपूर्ण राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात मोर्चे काढण्यात येत आहेत. यापूर्वी नाशिक, पुसद, पिंपरी-चिंचवड, अमरावती अशा विविध ठिकाणी मोर्चा काढल्यानंतर रविवारी मुंबईत मोर्चा काढण्यात आला होता.

शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी मुंबईतील मोर्चावर प्रतिक्रिया देताना हिंदूंचे राज्य आले असे सांगूनही स्वत:ला हिंदू समजणाऱ्या नेत्यांकडून न्याय मिळत नाही म्हणून आक्रोश मोर्चे निघत आहेत, अशी टीका केली. शिवसेना भवनासमोरील या आक्रोश मोर्चाच्या फोटोसह त्यांनी ट्विटच्या माध्यमातूनही या मोर्चावर निशाणा साधला.

सकाळ ५.५१.२०

# घरफोडी करणाऱ्या टोळीला अटक

## पेल्हार गुन्हे पथकाची कारवाई

नालासोपारा, ता. २९ (बातमीदार) : नालासोपारा परिसरात घरफोडी, चोरी करून फरारी होणाऱ्या टोळीचा भांडाफोड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. या टोळीतील तिघांना अटक करून त्यांची चौकशी केली असता त्यांनी पेल्हार पोलिस ठाण्यातील तीन गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून टाटा एस कंपनीचा एक टेम्पो, एक दुचाकी, कटर, कटावणी, स्क्रू ड्रायव्हर, पाना असा एकूण ५ लाख ९६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

राजेश कदम उर्फ घोचू, अजयन पाऊर विडू ऊर्फ पी व्ही, हरिंद्र गुप्ता असे अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. हे तिघेही कांदिवली, बांद्रा, नालासोपारा परिसरात राहणारे आहेत. यातील राजेश कदम याच्यावर मुंबई, पालघर, रत्नागिरी, रायगड या परिसरात वेगवेगळे १६ गुन्हे दाखल आहेत. अजयन विडू याच्यावर नालासोपाराच्या तुलिंज, वाकोला, मुंबई या परिसरात ३ गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, पेल्हार पोलिस ठाणे हद्दीतील वसई पूर्व नवजीवन सोसायटीमधील मामुन हारून पियार्जी यांच्या दुकानाच्या शटरचे लॉक तोडून, दुकानातील विविध कंपन्यांच्या मोटार सायकलचे वेगवेगळे पार्ट, डिव्हीआर, टीव्ही, टुल्स असा एकूण २ लाख ९० हजारांचा मुद्देमाल ५ ते ७ जानेवारीच्या दरम्यान चोरी झाला होता. याबाबत पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता.

सकाळ पा.नं.२०

# तरुणीच्या आत्महत्याप्रकरणी वसईत दोघा मित्रांना अटक

## चॅटिंगवेळी स्वैराचाराच्या आरोपामुळे कृत्य

नालासोपारा, ता. २९ (बातमीदार) : व्हॉट्सअपवर मित्रांनी स्वैराचाराचे आरोप केल्यामुळे वसईत एका २१ वर्षीय तरुणीने राहत्या घरात पंख्याला गळफास लावून आत्महत्या केली होती. या प्रकरणी मृत्यूच्या २४ दिवसांनंतर तिच्या वडिलांच्या तक्रारीवरून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोन तरुणांवर शनिवारी (ता. २८) गुन्हा दाखल करत त्यांना अटक करण्यात आली. या आरोपींना आज (ता. २९) वसई न्यायालयात हजर केले असता ३१ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

सॅविन घोन्साल्वीस आणि एबल डिसूझा (दोघेही रा. वसई) या मित्रांबरोबर ४ जानेवारी रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ही तरुणी व्हॉट्सअपवर चॅटिंग करत होती. या दरम्यान त्यांनी तिच्याबरोबरच्या संबंधातून अश्लील मेसेज पाठवत विविध प्रश्नांची सरबत्ती केली. त्यानंतर तिच्यावर लैंगिक स्वैराचाराचे आरोप करत रात्रभर अनेक मेसेज पाठवले होते. हा मानसिक त्रास असह्य झाल्याने तिने राहत्या घरात पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याचा आरोप करत मृत तरुणीच्या वडिलांनी वसई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. याच तक्रारीवरून दोन तरुणांवर गुन्हा दाखल करून त्यांना पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले.

CamScanner

पुण्यनगरी ५.५.२०

# एसटी चालकाला मारहाण करणाऱ्यास अटक

## थुंकल्याचा आरोप, व्हिडीओ व्हायरल

**। नालासोपारा** : ठाणे-नालासोपारा एसटी बस तुळींज रोड ब्रिजजवळ आली असता, एसटीमधून अज्ञात व्यक्ती थुंकली. मात्र, चालक थुंकल्याचा आरोप करून दुचाकीस्वाराने चालक एम. आर. व्यवहारे याला शिवीगाळ करून मारहाण केली. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी दुचाकीस्वाराविरोधात तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सराफ अली मलिक (४०) असे मारहाण करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे.

चालक एम. आर. व्यवहारे व वाहक सुनील गणेश जाधव एसटी बसने नालासोपारा (प.) ते अंबाडी (ता. वाडा, जि. पालघर) येथे ७.३० सुमारास पोहोचले. तेथे रिपोर्ट करून परतीच्या प्रवासात अंबाडी येथून नालासोपारा (प.) येथे येण्यासाठी निघाले. बस ९च्या सुमारास नालासोपारा (पूर्व) येथील राधाकृष्ण हॉटेल जवळील उत्तरवाहिनीच्या रस्त्यावर सिग्नलच्या जवळ असताना अचानक बससमोर एक अनोळखी व्यक्ती व त्याच्या सोबत एक महिला यांनी त्यांच्या ताब्यातील दुचाकी बससमोर आडवी करून चालकाच्या दिशेने शिवीगाळी करू लागला. चालक बसलेल्या ठिकाणी येऊन बसचा दरवाजा उघडू लागला. चालकाने त्यास विचारणा केली. तू गाडी चालवताना माझ्या अंगावर एसटीतून गुटखा खाऊन का थुंकला? असे म्हणत शिवीगाळ करून अंगावर धावून आला. चालकाने समजावले. दुसरे कोणीतरी थुंकले असेल, मला माहीत नाही. तरीही अनोळखी व्यक्तीने चालकाला जबरदस्ती खेचून खाली उतरवले, मारहाण केली.

वाहक सुनील जाधव मध्यस्त करताना त्यांनादेखील त्याने शिवीगाळ केली. व्यक्ती कोणाचेही ऐकत नसल्याने वाहकाने मोबाइलमध्ये सदर अनोळखी व्यक्ती मला शिवीगाळ, मारहाण करत असल्याचा व्हिडीओ रेकॉर्ड केला. हे पाहताच अनोळखी महिलेने पळ काढला. सराफ अली मलिक (४०) असे मारहाण करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. एम. आर. व्यवहारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून या प्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सराफ अली मलिक यास अटक केली आहे.

# Two fake cops held for extortion

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The presence of mind shown by a 23-year-old woman on Thursday evening led to the arrest of two men who impersonated cops and tried to extort money from her family in Bhayandar. The family was also threatened with implications in a false case of running a prostitution racket.

According to the police, the duo Sudarshan Khandare and Jitendra Patel identified themselves as cops from the local police station and barged into the complainant's flat. The duo threatened the family with arrest for operating a prostitution racket and defaming them in the housing society, police said. They also demanded Rs5 lakh from the family.

Expressing the inability to arrange such a huge amount, the complainant agreed to provide her mother's gold ornaments. However, the complainant managed to inform her younger sister about the matter. The complainant's sister informed the police who reached the flat and arrested Khandare.

Unaware of the development, Jitendra Patel landed at the building in an auto-rickshaw with the money only to be welcomed by real policemen.

Apart from other sections in the IPC, the duo has been arrested for impersonating a public servant, extortion, cheating and criminal conspiracy.

CS CamScanner

# Recently out of jail, junkie arrested for serial thefts

SURESH GOLANI
MIRA BHAYANDAR

A notorious burglar, who was recently released from prison, was again arrested by the crime branch unit (Zone III) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police for his alleged involvement in a spate of daylight house break-in cases in the twin-city.

According to the police, the accused, identified as Akram Farookh Ansari (24), was previously involved in over a dozen theft cases for which he was caught and sent to judicial custody.

After his release in October 2022, Akram again started committing crimes. Alarmed by the sudden rise in cases of daylight burglaries, the crime branch team led by Police Inspector Pramod Badhaak under the guidance of DCP (crime) Avinash Ambure was roped in to conduct parallel investigations into the case.

During the investigations, the team analysed footage captured by CCTV cameras of the crime scene and getaway route of the bike-borne thief which led to his identification. The team activated their informer network and based on a tip-off arrested him from Palghar district.

epaper.freepressjournal.in

**Prima facie probe has revealed his involvement in 14 unsolved cases of theft**



"Prima facie investigations have revealed his involvement in 14 unsolved cases of thefts which were committed in Virar within a span of two months. The accused committed the crimes to fund his habit of consuming drugs," said Badhaak.

Apart from the bike used in the crimes, the police recovered stolen booty including mobile phones, gold and silver ornaments, collectively worth more than Rs 2.89 lakh, from the possession of the accused who has been booked under sections 380 and 454 of the IPC. Further investigations were on.

THE FREE PRESS JOURNAL

CamScanner

9 राज्य, 18 संस्करण मुंबई, पुणे, रांची, लखनऊ, कोलकाता, जयपुर, जबलपुर, ग्वालियर, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, जालंधर से एक साथ प्रकाशित | मूल्य ₹ 5.00

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, रविवार, 29 जनवरी 2023

निष्पक्ष नज़र, निष्पक्ष ख़बर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अख़बार

**सुविचार**

मै कर सकता हूं, यह विश्वास है। केवल मैं ही कर सकता हूं, यह अंधविश्वास है।

अंदर पढ़ें

पेज 08

# क्राइम ब्रांच यूनिट 3 ने दिनदहाड़े घर में चोरी करने वाले आरोपी को गिरफ्तार किया, 14 मामलों का खुलासा

**दबंग रिपोर्टर » वसई**



दिनदहाड़े घर में चोरी करने वाला शातिर चोर को एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 3 यूनिट ने गिरफ्तार कर लिया है।इस मामले में 1 आरोपी की गिरफ्तारी हुई है। तथा 14 अपराधों की गुत्थी सुलझ गयी व 2 लाख से ज्यादा माल जप्त कर आगे की कर कार्रवाई जा रही है। पुलिस ने यह जानकारी शनिवार को दी है। यह सफलता डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे व एसीपी (क्राइम ) अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 यूनिट के पीआई प्रमोद बड़ाख की टीम ने पाई है।पुलिस ने बताया कि मीरा भाईदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के तहत विरार क्षेत्र में दिन के समय चोरी और चोरी में वृद्धि के कारण, वरिष्ठ पुलिस अधिकारियों ने उक्त घटनाओं को गंभीरता से लिया है और आरोपियों की जांच करने और अपराधों को प्रकाश में लाने के लिए मार्गदर्शन दिया है।पुलिस के मुताबिक,21 जनवरी 2023 को रुक्मिणी कृष्णा गोवेकर के घर का अज्ञात चोर ने ताला तोड़कर घर से 28,500 रुपये का आभूषण व नगदी चोरी कर फरार हो गया था।इस मामले में गोवेकर ने विरार पुलिस थाने में एफआईआर दर्ज करवाई थी,पुलिस ने बताया कि वरिष्ठ पुलिस अधिकारी के आदेश पर उक्त अपराध की जांच क्राइम ब्रांच 3 विरार यूनिट को सौंपी गई थी,उक्त अपराध में पुलिस उपायुक्त अपराध (अविनाश अंबुरे ) सहायक पुलिस आयुक्त अपराध (अमोल मांडवे ) के निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार क्राइम ब्रांच-3 विरार टीम ने उक्त अपराध का तकनीकी विश्लेषण कर गुप्त से गोपनीय जानकारी प्राप्त की और आरोपी अक्रम फारुक अन्सारी 24 को हिरासत में लेकर कड़ी पूछताछ के बाद उसे गिरफ्तार कर लिया है।उक्त अभियुक्तों की पुलिस हिरासत के दौरान,अपराध में प्रयुक्त वाहन, सोने और चांदी के आभूषण, 2,89,550/- रुपये मूल्य का मोबाइल फोन जब्त किया गया।पुलिस ने कहा कि कुल 14 अपराधों (चोरी विरार थाने में दर्ज ) का खुलासा हुआ है,पुलिस के मुताबिक आरोपी के रिकॉर्ड की जांच की गई तो उसके खिलाफ वसई, विरार क्षेत्र के विभिन्न थानों में चोरी के 10 मामले दर्ज थे तथा गिरफ्तार आरोपी वर्तमान में विरार थाना में कलम 454,380 के तहत पुलिस हिरासत में है और अपराध की आगे की जांच जारी है।

CamScanner

# पीएसआय गोईलकर यांना राष्ट्रपती पदक जाहीर





**वसई, प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती पोलीस पदकांची घोषणा झाली आहे. यामध्ये विरार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरिक्षक सुभाष गोईलकर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर पीएसआय गोईलकर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्व पोलीसांसाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे. २६ जानेवारी रोजी आयुक्तालयात आयोजित कार्यक्रमात पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्रालयाकडून प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस पोलीस पदाकांची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र पोलीस सेवेत ०७ डिसेंबर १९९१ साली पोलीस कॉन्स्टेबल म्हणून सुभाष गोईलकर सेवारत झाले होते.

१० मार्च २००५ रोजी त्यांना पोलीस नाईक, २५ ऑक्टोबर २०११ रोजी हेड कॉन्स्टेबल, ०१ ऑक्टोबर २०१८ रोजी सहाय्यक पोलीस निरिक्षक तर ०५ जुलै २०२२ रोजी पोलीस उपनिरिक्षक पदी बढती मिळाली. सध्या ते विरार पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरिक्षक पदावर कार्यरत आहेत. गोईलकर यांची पोलीस सेवेत ३१ वर्ष झाली आहेत. या कालावधीत त्यांना उत्कृष्ट सेवेबद्दल अनेक रिवॉर्ड मिळाले आहेत.

राष्ट्रपदी पदक जाहीर झाल्याचे समजताच विरार पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक राजेंद्र कांबळे यांनी व त्यांच्या सर्व सहकार्यांनी पीएसआय गोईलकर यांचा यथोचित सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. लवकरच राज्यपालांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.




# विजय मामा चषक २०२३ क्रिकेट स्पर्धेचा शानदार उद्घाटन सोहळा संपन्न

वी-२४ फाऊंडेशन व आगरी सेना पुरस्कृत विजय मामा चषक २०२३ क्रिकेट स्पर्धेचा शानदार उद्घाटन सोहळा नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी आगरी सेना महाराष्ट्र उपाध्यक्ष कैलास पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. सदर स्पर्धा ग्रामीण व शहरी अशा दोन भागांत खेळवली जाणार असून क्रिकेटपटूंचा उत्साह वाढविण्यासाठी विजेत्यांसाठी भरघोस रोख बक्षिसेही ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेचे हे सोळावे वर्ष असून अंतिम सामना २ फेब्रुवारी रोजी खेळवण्यात येणार आहे. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी आगरी सेना पालघर प्रवक्ते जयेश पाटील, विजय पाटील, मल्हार तावरे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# कलियुगातील राम व सीताआईचा नवस पूर्ण करण्यासाठी २२००,कि.मी. चा पाई प्रवास



रोडच्या कडेनं जाणारं प्रत्येक गरीब जोडपं भिकारी असतंच, असं काही नाही ...आज कोपरगाव येथून येत असताना रोड च्या कडेने एक म्हातारं जोडपं जाताना दिसलं माझी नेहमीची सवय असल्यामुळं मी त्या भिकारी दिसणाऱ्या जोडप्याला दुपार असल्यामुळं सहजच जेवणाचं विचारलं, तर ते नको म्हणाले. मग मी त्यांना १०० रुपये देऊ केले, तर ते सुद्धा नको म्हणाले , मग पुढचा प्रश्न विचारला की :तुम्ही असे का हिंडताय? मग सुरू झाला त्यांचा जीवनपट - ते २२०० चा प्रवास करून आता द्वारकेला स्वतःच्या घरी परत चालले होते. त्यांनी सांगितले की माझे दोन्ही डोळे १ वर्षांपूर्वी गेले होते आणि डॉक्टरनी सांगितले की ऑपरेशन करून उपयोग नाही मग माझ्या आईने डॉक्टर ला भेटून ऑपरेशन करायला भाग पाडले व तिने श्री कृष्ण मंदिरात जाऊन देवाजवळ नवस केला की, डोळे परत आले तर माझा मुलगा पदयात्रा करत बालाजी व पंढरपूर ला जाऊन परत द्वारकेला पायी येईल, म्हणून मी आईच्या शब्दासाठी पदयात्रा करतोय , मग मी त्यांच्या बायकोविषयी विचारलं तर ती पण मला एकटं सोडायला तयार नव्हती व रस्त्याने मी तुम्हाला जेवण तयार करायला येते, म्हणून निघाली.मग मी ते २५% हिन्दी ७५% इंग्रजी बोलत असल्यामुळे शिक्षण विचारलं तर माझी बुद्धी ऐकून सुन्न झाली. त्यांनी लंडन येथे ऑक्सपोर्ड युनिव्हर्सिटी मध्ये ७ वर्षे खगोलशास्त्र यावर पी एच डी केलीय तर त्यांच्या बायकोने मनोविकार शास्त्र या विषयावर लंडन येथेच पी एच डी केलीय (एवढं शिकून सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर गर्व नाही, नाहीतर आपल्या कडे १० नापास सुद्धा छाती ताणून हिंडतो ) एवढंच नाहीतर व सी. रंगराजन (गव्हर्नर) यांचे बरोबर , तसेच कल्पना चावला ह्यांच्या बरोबर काम व मैत्रेचे संबंध होते, तसेच त्यांना मिळणारी मासिक पेन्शन ते एक अंध ट्रस्ट ला ते देऊन टाकतात. सध्या ते सोशल मिडियापासून लांब राहतात ,रोडच्या कडेन जाणार प्रत्येक जोडपं भिकारी असतंच असं काही नाही, एखादा पुरुष हा आपल्या आईच्या शब्दासाठी प्रभू राम व्हायला तयार होतो आणि आपल्या पतीसोबत कोणी स्त्री सीता सुद्धा होते, म्हणूनच आज भेटलेली माणसे कलीयुगातील मी तर राम-सीता च समजतो आम्ही जवळ जवळ १ तास त्यांच्याशी गप्पा मारल्या रोडवर उभा राहूनच. इतके प्रगल्भ विचार एकूण मन सुन्न झाले. अहंकार गळून गेला. आणि वाटलं की आपण उगाचच खोट्या फुशारकीवर जगतो. त्या व्यक्तीच्या बोलण्यातील सहजपणा बघून असं वाटलं की आपण या जगात शून्य आहेत. हा पायी प्रवास बघून थक्क झालो. प्रवासाला निघून तीन महिने झाले आणि अजून घरी पोहचायला एक महिना लागेल.त्यांचे नाव -डॉ. देव उपाध्याय व डॉ. सरोज उपाध्याय.. कलीयुगातील राम सीता...!!!

- साभार : बाबा आमटे विचारधारा ग्रुप

Printed, Published and Owned by Mrs.VIDYA VIJAY KHETALE "Printed at Jivdani Art Media, Near Parera House, Next to Natalia Bungalow, Navpada, Vasai (W), Tal-Vasai, Dist- Palghar, Maharashtra, Pin-401202"and Published from Room no - 106, B-Alpa CO-OP Hous.Soci, Ltd, Shastri Nagar, Vasai (W), Tal- Vasai, Dist- Palghar, Pin-401202. Telphone No - 0250- 2330038, Mob. No- "9370188465, E-mail-vikasvasa28@gmail.com, Editor. Mrs. VIDYA VIJAY KHETALE,
RNI NO - MAHMAR/2012/44727

CS CamScanner